# <u>प्रेस नोट</u>

## पत्नीचा खुन केलेल्या फरारी आरोपीला बंडगार्डन पोलीसांनी केले जेरबंद

बंडगार्डन पोलीस स्टेशनचे निखिल जाधव यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशिर बातमी मिळाली की, इंद्रायणी कॉलनी, कामशेत, ता. मावळ, जि. पुणे येथे पत्नीचा खुन करुन फरार झालेला इसम नामे हिरामण बसप्पा कांबळे हा पुणे रेल्वे स्टेशन येथे आलेला असून तो रेल्वेने कोठेतरी निघून चालला आहे. अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने बंडगार्डन पोलीस स्टेशन कडील डी.बी. पथकाने यांनी मिळालेल्या बातमीप्रमाणे पुणे स्टेशन परिसरात सापळा रचला असता सकाळी १०.०० वा. चे सुमारास बातमीदाराने दिलेल्या बातमीतील वर्णनाचा एक इसम रेल्वे स्टेशनच्या रिझर्वेशन काऊंटर जवळ उभा असल्याचे दिसताच बातमीतील इसम हाच असल्याची खात्री झाल्याने त्यास ताब्यात घेण्याकरीता पोलीस त्याचे जवळ जात असताना पोलीसांना पाहून तो तेथून पळून जाऊ लागल्याने पोलीसांनी त्यास शिताफीने पकडले. त्याचे नाव हिरामण बसप्पा कांबळे, वय-४१ वर्षे, रा. इंद्रायणी कॉलनी, कामशेत, ता. मावळ, जि. पुणे असे आहे.

हिरामण कांबळे याने दि.११/०१/२०१८ रोजी सकाळी १०.०० वा. चे सुमारास त्याचे राहते घरात पत्नीबरोबर वादविवाद झाल्याने व त्याचा राग सहन न झाल्याने तिक्ष्ण हत्याराने भोसकुन तिचा खुन केला. सदर बाबत कामशेत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे खुनाचा गुन्हा दाखल आहे. हिरामण कांबळे यास बंडगार्डन पोलीसांनी कामशेत पोलीसांच्या हवाली केले.

सदरची कारवाई, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, श्री. रविंद्र सेनगावकर, परिमंडळ-२ चे पोलीस उप-आयुक्त डॉ. प्रविण मुंढे, सहा. पोलीस आयुक्त जयश्री गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक एम.एम.मुजावर, पोलीस निरीक्षक, गुन्हे, राम खोमणे यांचे सुचनांप्रमाणे बंडगार्डन पोलीस स्टेशन कडील तपास पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक सतिश पवार, संतोष पागार, नवनाथ डांगे, अय्याज दड्डीकर, सचिन कदम, कैलास डुकरे, रुपेश पिसाळ, निखील जाधव यांचे पथकाने केली.